**नियमीत दिवाणी दावा २९-२०२६**
विक्रम वि. तहसीलदार व इतर

## निशाणी क्र. ५ वरील आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १ व २ अनुसार तात्पुरता मनाई आदेश मिळण्याकरिता दाखल करण्यात आलेला आहे. वादीचे विधीज्ञांनी असा युक्तीवाद केला की, प्रतिवादी क्रमांक १ तहसीलदार यांनी संचीका क्रमांक २०२४/जमा–२/कावि/९१ मध्ये दिनांक १६.१०.२०२५ रोजी दिलेल्या निकालाच्या आधारे मौजे पिंपळवाडी येथील गट क्रमांक ३७, ४० ते ४४ मधील वादींच्या जमिनीतून प्रतिवादी क्रमांक ३ ते ९ यांच्याकरिता नवीन रस्ता तयार करण्याच्या प्रयत्नात आहेत. तसे झाल्यास वादींचे जमिनीचे व पिकांचे नुकसान होणार आहे. पुढे वादीच्या विधीज्ञांनी असा युक्तीवाद केला की, तहसीलदार, परंडा यांनी महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम चे कलम १४३ च्या तरतुदी अनुसार वर नमुद जमिनीच्या सर्वे बांधावरुन रस्ता मंजुर न करता वादींच्या जमिनीतून पुर्व–पश्चिम रसता मंजुर केलेला आहे. तरी अर्ज निशाणी ५ चे चौकशी होईपावेतो तुर्तातुर्त एकतर्फा मनाई आदेश प्रतिवादी यांच्याविरुद्ध देण्यात यावा अशी विनंती केली आहे.

२. संचिकेचे अवलोकन केले असता वादींनी तहसीलदार, परंडा यांनी दिनांक १६.१०.२०२५ रोजी दिलेल्या निकालास आव्हान दिलेले आहे. सदर निकालाचे अवलोकन केले असता प्रथमदर्शनी न्यायालयास असे दिसून येते की, तहसीलदार, परंडा यांनी महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम चे कलम १४३ अनुसार सर्वे बांधावरुन रस्ता मंजुर न करता वादींची जमीन गट क्रमांक ३७ व ४० ते ४४ मधून पुर्व पश्चिम प्रतिवादी क्रमांक ३ ते९ यांच्याकरिता नवीन रसता मंजुर केलेला आहे. निश्चीतच तहसीलदार, परंडा यांनी वरीलप्रमाणे पारीत केलेल्या आदेशाची अंमलबजावणी झाल्यास प्रस्तुतचा दावा दाखल करण्यास कोणताही अर्थ राहणार नाही. सबब, प्रतिवादी यांच्याविरुद्ध एकतर्फा तुर्तातुर्त मनाई आदेश पारीत

करणे न्यायाच्या दृष्टीने योग्य होणार आहे त्याअनुषंगाने मी खालीलप्रमाणे आदेश पारत करीत आहे.

## आदेश

१. प्रतिवादी क्रमांक १ ते ९ यांना आदेशीत करण्यात येते की, तहसीलदार यांनी संचीका क्रमांक २०२४/जमा–२/कावि/९१ मध्ये दिनांक १६.१०.२०२५ रोजी दिलेल्या निकालाची अंमलबजावणी करु नये, असा तुर्तातुर्त मनाई आदेश प्रतिवादी हे हजर होऊन निशाणी क्रमांक ५ वर त्यांचे म्हणणे दाखल करेपर्यंत देण्यात येत आहे.

२. वादींना आदेशीत करण्यात येते की, त्यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम ३अ ची पुर्तता दिनांक २०.०१.२०२६ रोजीपर्यंत करावी.

३. प्रतिवादींना निशाणी क्रमांक ५ च्या अर्जासंदर्भात नोटीसा काढण्यात याव्यात.

ABDUL KARIM ABDUL RAHIMAN SHAIKH
Digitally signed by ABDUL KARIM ABDUL RAHIMAN SHAIKH
Date: 2026.01.12 13:45:19 +0530

दिनांकः–०९.०१.२०२६

**(अ. अ. शेख)**

दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, परंडा

CERTIFICATE

I affirm that, the contents of this P.D.F file Judgment/order are same, word to word, as per the original Judgment/order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | - | Vaibhav Mohanrao Ingale<br>Stenographer (Grade-III) |
| Court | - | Civil Court Senior Division, Paranda. |
| Date | - | 09-01-2026 |
| Order signed by the presiding officer on | - | 09-01-2026 |
| Order uploaded on | - | 10-01-2026 |